सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र. 2486
प्राप्त दि. 29 MAR 2016
विभाग-


महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-५०१६/प्र.क्र.७२/आस्था-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, २५ बांधकाम भवन, मर्झबान पथ,
मुंबई-४००००१.
दिनांक- १६ मार्च, २०१६.

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

आवक क्र. 3993
16 APR 2016


**विषय-महिला कंत्राटी ग्रामसेवक यांना अनुज्ञेय प्रसुती रजा सवलत कर्तव्य कालावधी म्हणून ग्राहय धरण्याबाबत.**

संदर्भ- जिल्हा परिषद, भंडारा यांचे पत्र क्रमांक-भंजिप/पंचा/कार्या-१५/८६५/१४, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४.

जिल्हा परिषदांतर्गत कार्यरत महिला कंत्राटी ग्रामसेवक यांना प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेली प्रसुती रजा सवलत तीन वर्षाच्या कंत्राटी कालावधीसाठी कर्तव्य काळ म्हणून समजण्यात यावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती संदर्भाधिन पत्रांन्वये करण्यात आलेली आहे.

२. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये ग्रामसेवकांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतात. तीन वर्षाच्या कंत्राटी कालावधीनंतर सदर कर्मचा-यांची नियमित वेतनश्रेणीमध्ये नियुक्ती करण्यात येते. या नियुक्तीच्या अटी व शर्ती या विभागाच्या दिनांक ६ जून, २००१ च्या शासन निर्णयांन्वये निश्चित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये थोडी सुधारणा करुन दिनांक २० एप्रिल, २००६ च्या शासन निर्णयातील अनुक्रमांक- ३ अन्वये महिला कर्मचा-यास प्रचलित नियमानुसार प्रसुती रजा अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच अनुक्रमांक -५ नुसार कंत्राटी ग्रामसेवक यांच्या सेवा सेवानिवृत्ती व सेवानिवृत्ती विषयक इतर लाभासाठी ग्राहय धरली जाईल असे नमूद करण्यात आले आहे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ (२) (बी) नुसार कायम सेवेत नसलेल्या परंतु एक वर्षापेक्षा अधिक सेवा झालेल्या महिला कर्मचा-यांना प्रसुती रजा अनुज्ञेय आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या दिनांक १५ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयांन्वये या तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात आली असून महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ (२) (ए) आणि (बी) मधील किमान सेवेची अट रदद करण्यात आली आहे. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या या महिला कर्मचा-यांस

प्रसुती रजा व रजा वेतन या शासन निर्णयात नमूद केलेल्या शर्तींच्या अधीन राहून अनुज्ञेय केलेली आहे. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार महिला कंत्राटी ग्रामसेवकांना प्रसुती रजा सवलत अनुज्ञेय ठरते. (सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे).

४. ० कंत्राटी ग्रामसेवक यांच्या कंत्राटी काळातील सेवा सेवानिवृत्ती व सेवानिवृत्ती विषयक इतर लाभासाठी ग्राहय धरली जाते. त्यामुळे महिला कंत्राटी ग्रामसेवक कर्मचा-यांना अनुज्ञेय केलेला प्रसुती रजेचा कालावधी तीन वर्षाचा कंत्राटी कालावधीसाठी कर्तव्य काळ म्हणून समजण्यात यावा .

( गोविंद माईणकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

निवडनस्ती (आस्था-७)